महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

कार्यालय : 'भास्कर', 68, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे – 424 001.

भ्रमण ध्वनी : +91 - 9422790610, 8975130609 Email : avinashpatilmans@gmail.com, avinashpatilmans2025@gmail.com

दिनांक – 29 जुलै 2021

## प्रसिध्दी पत्रक

### जादूटोणा आणि हानिकारक धार्मिक विधींचा निषेध आणि कारवाईबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने केला ठराव मंजूर - महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे महत्त्वपूर्ण योगदान

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विचक्राफ्ट अॅंड ह्युमन राइट्स इनफरर्मेशन नेटवर्क (WHRIN) आणि अनेक स्वयंसेवी संस्था, विद्यापीठे, विषय तज्ज्ञ यांच्या सहा वर्षांच्या अथक प्रयत्नांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने मानवी हक्कांच्या उल्लंघनास कारणीभूत असलेल्या जादूटोणा आणि हानिकारक धार्मिक विधींच्या आरोपांशी संबंधित हानिकारक प्रथा विरोधाचा ठराव दिनांक 12 जुलै 21 रोजीच्या 47व्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या अधिवेशनात एकमताने मंजूर झाला. जादूटोणा आणि हानीकारक धार्मिक प्रथा या प्रश्नावर कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि त्यागामुळे हा ठराव मंजूर झाला आहे. यामुळे जादूटोणा संबंधित कारणांमुळे होणाऱ्या अत्याचाराचा सामना करीत असलेल्या जगभरातील असंख्य लोकांना न्याय मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. अशा स्वरूपाच्या प्रथांचा अभ्यास करणे संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने श्रीमती ईकपोनवोसा ईरो (Ikponwosa Ero) यांची नेमणूक केली होती. त्यांच्या समवेत विचक्राफ्ट अँड ह्युमन राईट इन्फरमेशन नेटवर्क चे सदस्य असलेल्या जगभरातील अनेक स्वयंसेवी संस्था, विद्यापीठे, विषय तज्ञ इत्यादींनी गेली सहा वर्षे अथक परिश्रम आणि संशोधन करून संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेत अहवाल सादर केला होता. महाराष्ट्र अंनिसच्या माध्यमातून महाराष्ट्रात पारित झालेला जादूटोणाविरोधी कायदा आणि त्या अंतर्गत दाखल झालेले गुन्हे तसेच डाकीण प्रथेच्या संदर्भातील महाराष्ट्रातील आणि भारतातील महत्त्वाच्या घटनांचा संख्याशास्त्रीय अभ्यास करून अहवालात समावेश केलेला होता. विचक्राफ्ट अँड ह्युमन राईट इन्फरमेशन नेटवर्कचे संचालक ग्यारि फोक्सक्राफ्ट (Gary Foxcroft), लॅन्केस्टर युनिव्हर्सिटीच्या डॉ. चारलोटे बेकर (Charlotte Baker) यांचे बरोबरच महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील तसेच आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे कार्यवाह प्रा.डॉ. सुदेश घोडेराव यांचेही महत्त्वपूर्ण योगदान हा अहवाल तयार करणेसाठी झाले.

मागील दशकात जगभरातील 50 देशात आणि सहा खंडांमध्ये वीस हजार पेक्षा अधिक नोंदणी झालेल्या मानवाधिकार उल्लंघनाच्या घटना आहेत. यात प्रामुख्याने जगभरातील महिला, मुले, वयस्कर व्यक्ती, अपंग व्यक्ती विशेषत: अल्बनिझम असलेल्या व्यक्ती, विविध व्याधी जसे अपस्मार, ऑटिझम आणि वेड लागणे अशा घटनांमध्ये, परिस्थितीमध्ये जीवे मारणे, शरीराचे अवयव, हात पाय तोडणे, मालमत्ता हडप करणे, छळ करणे इत्यादी साठी जादूटोणा आणि हानिकारक धार्मिक विधींचे आचरण केल्यामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होत होते. आजारपण, मृत्यूची कारणे, धार्मिक विधी मधून प्राप्त होणारा नफा, अपुरी आरोग्यसेवा, शास्त्रीय माहितीचा अभाव, दारिद्र्य, अन्याय आणि एकूणच सुरक्षिततेबाबत अपुरी व्यवस्था इत्यादी घटकांमुळे अशा घटनांना लोक बळी पडतात. गंभीर स्वरूप असलेल्या या जादूटोणा आणि अनिष्ट, अघोरी, गुंतागुंतीच्या हानिकारक प्रथा, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने केलेला हा ठराव पूर्णपणे रोखू शकत नसल्या तरी अशा प्रकारच्या हानीकारक पद्धतींचे वैशिष्ट दर्शवणाऱ्या, भयानक हिंसाचारास प्रतिबंध करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

दिनांक 21, 22 सप्टेंबर 2017 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने जेनेवा येथे याच विषयाला अनुसरून आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये सहभागसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितिला निमंत्रण मिळाले होते. समितीच्या वतीने राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांचा सहभाग निश्चित केला होता परंतु व्हिसा विषयक तांत्रिक

अडचणीमुळे ते प्रत्यक्ष सहभागी झाले नाही. तरी देखील या विषयावर तयार करून पाठवलेले अभ्यासपूर्ण टिपण संयोजकांनी कार्यशाळेत सादर केले. या कार्यशाळेसाठी पूर्वतयारी म्हणून संयोजकाद्वारा तयार करण्यात आलेल्या अहवालात भारतातील विविध राज्यात असलेल्या डाकीण प्रथा विरोधी कायद्यांचा उल्लेख आहे. त्याचबरोबर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या बलिदानानंतर पारित झालेल्या महाराष्ट्रातील जादूटोणाविरोधी कायद्याचा सखोल उल्लेख केलेला आहे.

वरील कार्यशाळेनंतरच्या पुढील कालावधीत 'विचक्राफ्ट अँड ह्युमन राईटस: ग्लोबल लर्निंग अं ॅड कन्वर्सेशनस' या विषयावर दिनांक 10, 11 जानेवारी 2019 रोजी लँनकेस्टर युनिव्हर्सिटी, युनायटेड किंगडम येथे संयुक्त राष्ट्रसंघ मानवाधिकार परिषदद्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र अंनिसचे आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांना निमंत्रण मिळाले होते, परंतु आर्थिक अडचणीमुळे ते प्रत्यक्षात सहभागी होऊ शकले नाही. महाराष्ट्रातील जादूटोणाविरोधी कायदा, भारतातील डाकीण प्रथा विरोधी कायदे यावर त्यांनी लिहिलेला अभ्यासपूर्ण लेख परिषदेच्या संयोजकांकडे सादर करण्यात आला होता.

विचक्राफ्ट अॅंड ह्युमन राइट्स इनफरमेंशन नेटवर्क तर्फे तयार करून संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या दि. 10 मार्च 2014 रोजीच्या 25व्या सेशनमध्ये सादर करण्यात आलेला '2013 ग्लोबल रिपोर्ट' हा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जीवनकार्याचा गौरव म्हणून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रकाशित करण्यात आला होता. यात देखील महाराष्ट्रातील जादूटोणाविरोधी कायद्याचा सविस्तर उल्लेख केलेला होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेमार्फत याच विषयावर नियुक्त केलेल्या श्रीमती ईकपोनवोसा ईरो (Ikponwosa Ero) यांनी देखील 'विशेष टिपण आणि संख्याशास्त्र अहवाल मार्च 2020' मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितिच्या सहभागाचा उल्लेख आहे.

महाराष्ट्रातील जादूटोणाविरोधी कायदा 2013 निर्मितीचा इतिहास, कायदेशीर अडचणी, संसदीय पातळीवर प्रवास तसेच कायद्यातील महत्त्वपूर्ण शब्दांचा अर्थ, व्याख्या आणि महत्त्वाचे म्हणजे खून आणि नरबळी यातील फरक कायद्याअंतर्गत दाखल झालेल्या विविध गुन्ह्यांची सविस्तर माहिती, प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या विविध बातम्या इत्यादी आवश्यक माहिती प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी विचक्राफ्ट अॅंड ह्युमन राइट्स इनफरमेंशन नेटवर्कचे संचालक गॅरी फा ॅक्सक्राफ्ट यांना चार वर्षात सातत्याने संपर्कात राहून दिली.

महाराष्ट्र अंनिसने केलेले सहकार्य, मार्गदर्शन अतिशय महत्त्वपूर्ण ठरले आणि त्याचाच परिपाक म्हणून 12 जुलै 2021 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेच्या 47 व्या अधिवेशनामध्ये हा ठराव मंजूर झाला असे प्रतिपादन गॅरी फॉक्सक्रोफ्ट यांनी केले आहे.

महाराष्ट्र अंनिसच्या तीन दशकांपेक्षा जास्त कालावधीतील कामाच्या तज्ञतेच्या अनुभवातून आणि जवळपास दीड दशकांच्या अथक पाठपुराव्यामुळे महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिले राज्य ठरले आहे. महाराष्ट्राच्या धर्तीवर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेमध्ये देखील ठराव मंजूर होऊ शकतो आणि भारतातील सर्वच राज्यात जादूटोणाविरोधी व सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याची गरज असतांनाही, देशपातळीवर सतत पाठपुरावा करून देखील केंद्र पातळीवर कायदा मंजूर होऊ शकत नाही ही शोकांतिका आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेने ठराव करून निर्माण केलेला आदर्श घेऊन भारताच्या संसदेमध्ये हे दोन्ही कायदे मंजूर करुन, असे कायदे करणारा जागतिक पातळीवरील भारत हा एकमेव देश हा मान मिळावा अशी मागणी महाराष्ट्र अंनिसच्या वतीने कार्याध्यक्ष अविनाश पाटील आणि आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी केली आहे.

**<u>आपले विश्वासू</u>**


| | |
|---|---|
| **प्रा. डॉ. सुदेश घोडेराव** | **अविनाश पाटील** |
| आंतरराष्ट्रीय समन्वयक | राज्य कार्याध्यक्ष |
| संपर्क क्रं – ९४२२२५७६५४ | संपर्क क्रं –९४२२७९०६१० |
| ईमेल – sudeshghoderao@gmail.com | ईमेल – avinashpatilmans@gmail.com |

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती